दैनिक लोकवाहिनी
Main Paper | 2025-09-01 | Page- 2
epaper.lokvahini.com

# जि. प. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे सायबर सुरक्षेची जनजागृती



**लोकवाहिनी न्यूज**

**भंडारा :** क्विक हिल फाऊंडेशन सोबत, सुरु झालेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अंतर्गत भंडारा येथील जि. प. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वरठी येथील विद्यार्थ्यांना जे.एम. पटेल कॉलेज, भंडारा च्या संगणक शास्त्र विभागाचे ईशा तिबुडे आणि तनुश्री कुंभारे या विद्यार्थ्यीनींनी सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन करत सायबर सुरक्षेची गरज अधोरेखित केली. मोबाईलचा वापर करत असतांना इंटरनेट व सायबर सुरक्षित व सतर्क राहणे गरजेचे असते हे देखिल त्यांनी उदाहरणासह पटवून दिले. सायबर वॉरिअर ईशा तिबुडे आणि तनुश्री कुंभारे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत इत्यंभूत माहिती देऊन स्वतःला व स्वतःच्या परिवाराला कसे सुरक्षित राहावे या बाबत अतिशय उत्कृष्टपणे मार्गदर्शन केले.

जि. प. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना क्विक हिल फाऊंडेशन तर्फे उत्कृष्ठ व्यासपीठ मिळाले असल्याचे मुख्याध्यापक प्रा. विजय हटवार यांनी सांगितले व यासाठी फाऊंडेशनच्या अनुपमा काटकर व अजय शिर्के यांचे त्यांनी आभार मानले. कार्यकमाचे आयोजन सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केली होती. सायबर वॉरियर ईशा तिबुडे आणि तनुश्री कुंभारे यांनी विद्यार्थ्यांना अतिशय उत्कृष्टपणे मार्गदर्शन केले. ■

Powered by Bharati Web